## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
## महाविद्यालयास उत्कृष्ट पर्यावरण संवर्धन पुरस्कार देण्यासंदर्भात नियमावली.

---

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे "**उत्कृष्ट पर्यावरण संवर्धन महाविद्यालय पुरस्कार**" देण्यासंदर्भातील स्वरूप व नियमावली.

**अ) स्वरूप**:

1. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयास प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, रोख बक्षीस रु.25000/- दिले जाईल.

**ब) नियमावली:**

1. किमान दहा वर्ष विद्यापीठ संलग्नता प्राप्त महाविद्यालयांनाच प्रस्तुत पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.
2. प्रस्तुत पुरस्कारासाठीचे प्रस्ताव /अर्ज महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत विद्यापीठात सादर करावे.
3. पुरस्कारासाठी अर्ज केलेल्या महाविद्यालयास यूजीसी कडून 2(f) & 12(B) मान्यता प्राप्त झालेले असावे.
4. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयांना पुढील दहा वर्षानंतर पुन्हा पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.
5. पुरस्काराचा प्रस्ताव विद्यापीठाला सादर करत असताना विद्यापीठाचे कुठलेही देयक थकीत नसावे.
6. सदर पुरस्कारासाठी मराठवाड्यातील पर्यावरण तज्ञ, माजी कुलगुरू, विद्यमान व्यवस्थापन परिषद सदस्य ,अधिसभा सदस्य ,विद्या परिषद सदस्य शिफारस करू शकतील. शिफारस करताना आवश्यक ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
7. छाननी समितीने निवड केलेल्या महाविद्यालयाचा अर्ज प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्राची सत्यता पडताळणी केल्यानंतर प्रत्यक्ष पाहण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी गठीत केलेली समिती अर्ज केलेल्या महाविद्यालयात पाठविण्यात येईल व गठीत समितीने दिलेला अहवाल हा अंतिम असेल.
8. प्रस्तुत गठीत समिती त्रिसदस्य समिती असेल, त्यापैकी एक समिती सदस्य मराठवाड्यातील पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारा तज्ञ असेल.
9. विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार हा अपवादात्मक परिस्थितीत परत घेण्याचा अधिकार हा विद्यापीठास राहील.
10. प्रस्तुत पुरस्कार शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून प्रतिवर्षी दिला जाईल.
11. सदर पुरस्काराचे वितरण पाच जूनच्या '**जागतिक पर्यावरण दिनाचे**' औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात येईल.

12. प्रस्तुत पुरस्कारासाठी गठीत केलेली एकच समिती पहिल्या तीन महाविद्यालयात भेट देईल समितीचा निर्णय अंतिम राहील.
13. छाननी समितीद्वारे छाननी झालेल्या महाविद्यालयाची गुणा ानुक्रमे पहिल्या तीन महाविद्यालयास विद्यापीठाने गठीत केलेली समिती प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करेल. त्यांच्या शिफारशीनुसार प्रस्तुत महाविद्यालयास पुरस्कार देण्यात येईल.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

### महाविद्यालयास उत्कृष्ट पर्यावरण संवर्धन पुरस्कार मिळण्यासाठी करावयाचा प्रस्ताव /अर्ज

---

**प्रपत्र “अ”**

शैक्षणिक वर्ष :

शिक्षण संस्थेचे नाव :

महाविद्यालयाचे नाव व स्थापना वर्ष :

महाविद्यालयाचा कोड :

विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेचे पत्र :

प्राचार्यांचे नाव :

महाविद्यालयाचा पूर्ण पत्ता :

मोबाईल नंबर :

ई-मेल आयडी :

पर्यावरणाच्या संदर्भात काम करणाऱ्या समन्वयकाचे नाव :

पत्ता :

मोबाईल नंबर :

ई-मेल आयडी :

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

महाविद्यालयास उत्कृष्ट पर्यावरण संवर्धन पुरस्कार मिळण्यासाठीचा तपशील, निकष व गुण.

प्रपत्र " ब "

| अनु. क्र | तपशील | निकष | गुण |
|---|---|---|---|
| 01 | 1.महाविद्यालय परिसरात किंवा महाविद्यालयाच्या मालकीच्या जागेमध्ये वीस वर्षापेक्षा अधिक वय असलेले वृक्ष. | वड, पिंपळ, औदुंबर (उंबर), लिंब, सागवान या वृक्षाची लागवड केलेली असावी.<br>➢ प्रत्येक वृक्षास 0.5 गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 02 | 1. महाविद्यालय परिसरात किंवा महाविद्यालयाच्या मालकीच्या जागेमध्ये मियावाकी फॉरेस्ट (Mayawaki forest) ची निर्मिती केली असल्यास. | ➢ मियावाकी जंगल निर्मितीस चार गुण.<br>➢ किमान शंभर चौरस मीटरवर लागवड असावी, या क्षेत्रामध्ये विविध देशी वृक्षाची लागवड केलेली असावी.<br>➢ मियावाकी प्रकल्प किमान दोन वर्षाचा पूर्ण झालेला असावा.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 03 | 1.महाविद्यालयातील वनस्पती उद्यान.<br>2. महाविद्यालय परिसरात वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष, शोभेची लहान झाडे, फुलांची लागवड वनस्पती उद्यानात असावी. | वनस्पती उद्यानामध्ये कमीत कमी 100 फुल झाडे/शोभेची झाडे असावेत आणि किमान अडीच हजार स्केअर फुटाची वनस्पती उद्यान महाविद्यालयाच्या मालकीच्या जागेत असावे.<br>➢ महाविद्यालयातील वनस्पती उद्यानासाठी चार गुण.<br>➢ वनस्पती उद्यान अडीच हजार स्केअर फुटापेक्षा कमी असेल तर त्या प्रमाणात गुण दिले जातील.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 04 | 1.औषधी वनस्पती.<br>( Medicinal Plants) | महाविद्यालयाच्या मालकीच्या जागेत तुळस, बेल, कडूनिंब, हळद, बेलाडोणा, कोरफड, नागरमोता, पुदिना, अश्वगंधा, आवळा, सर्पगंधा, भेडा, रिटा, बिबा, ट्रायडेक्स (जखम जुडी), गवती चहा, गुगळ, निरगुडी, निलगिरी, पानफुटी या औषधी वनस्पती किंवा इतर औषधी वनस्पतीची लागवड केलेली असावी.<br>➢ प्रत्येक वनस्पती लागवडीस 0.5 गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| 05 | 1.महाविद्यालयाने राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि स्थानिक पातळीवर एक दिवशी पर्यावरण परिषदेचे आयोजन/ पर्यावरणाच्या संदर्भात फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम(FIP) राबविलेला असावा.<br>2. पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्थेसोबतचा, स्वयंसेवी संस्थेसोबतचा करार (MoU) असावा.<br>3. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला आहे का?<br>4. महाविद्यालयीन परिसरात सांडपाण्याचा पुनर्वापर केल्या संदर्भातील कामे.<br>5. जल जीवन मिशन कार्यक्रमाचा महाविद्यालयाने प्रचार, प्रसार केला आहे का? | ➢ महाविद्यालयाने पर्यावरण परिषदेचे आयोजन केलेले असावे.<br>➢ राष्ट्रीय पर्यावरण परिषद तीन गुण, राज्यस्तरीय पर्यावरण परिषद दोन गुण, स्थानिक पर्यावरण परिषद एक गुण.<br>➢ FIP साठी एक गुण.<br>➢ पर्यावरणाशी संबंधित स्वयंसेवी संस्थेसोबतच्या प्रती कराराला एक गुण.<br>➢ विद्यार्थ्यासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला असल्यास एक गुण.<br>➢ सांडपाण्याचा पुनर्वापर केला असल्यास एक गुण.<br>➢ जल जीवन मिशन कार्यक्रम प्रचार एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 06 | **अ )लेख लिहिणे:**<br>1.महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि संस्था चालकाने विविध वर्तमानपत्रांमध्ये पर्यावरणाच्या संबंधित लेख, नियतकालिके, मासिकामध्ये लिखाण करून प्रकाशन केले असल्यास.<br>**ब) संपादन करणे:**<br>1.पर्यावरणा संदर्भात प्रकाशित केलेल्या नियतकालिकेचा/ मासिकाचा/ काव्यसंग्रहाचा संपादक, सहसंपादक इत्यादी. | पर्यावरणाच्या संदर्भात लिखाण असावे. पर्यावरण लिखाणामध्ये लेखकाचे नाव असणे आवश्यक आहे.<br>➢ प्रत्येक लेखास 0.5 गुण.<br>➢ पर्यावरणीय नियतकालिकेचा/ मासिकाचा/ काव्यसंग्रहाचा संपादक, सहसंपादक असेल तर एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 07 | **अ )ग्रंथ /पुस्तक लिहिणे**<br>1.पर्यावरण संवर्धन संदर्भात प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, संस्थाचालकाने, कादंबरी, काव्यसंग्रह, नाटक इत्यादी ग्रंथ/ पुस्तकाचे लेखन केलेले असावे. | ➢ प्रत्येक पर्यावरणीय ग्रंथास/ पुस्तकास एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 08 | 1.ग्रीन ऑडिट, एनर्जी ऑडिट, सोलर प्लांट, सोलार दिवे, सोलार पंप, पवन ऊर्जा प्लांट आणि वर्मी कल्चर (Vermiculture), व्हर्मीकंपोस्ट Vermicompost, सेरी कल्चर (Sericulture), फ्लोरिकल्चर (Floriculture), ओला व सुका घनकचरा व्यवस्थापनाचे काम महाविद्यालयाच्या जागेमध्ये असावे. | ➢ प्रत्येक कार्यास एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 09 | 1.प्लॅस्टिक फ्री कॅम्पससाठी राबविलेले कार्यक्रम.<br>2.ई-कचरा व्यवस्थापन करण्यासंदर्भात राबविलेले महाविद्यालयातील कार्यक्रम.<br>3. पेपरलेस ऑफिस, नो स्मोकिंग, नो टोबॅको इन द कॅम्पस एरिया संदर्भातील | ➢ प्रत्येक कार्यास एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यक्रम किंवा सूचनाफलक जागोजागी लावणे.<br>4. पर्यावरणाच्या संदर्भात महत्त्वाच्या ठिकाणी लावलेले बोर्ड जसे: पर्यावरण कविता, पर्यावरणीय विचार, पर्यावरण साहित्य, निसर्ग चित्र, वृक्ष, पक्षी, प्राण्याचे महत्त्व पटवून देणारे छायाचित्र.<br>5. पक्षी, प्राण्याच्या अधिवासाची कृत्रिम अथवा नैसर्गिक व्यवस्था केली असल्यास. | | |
| 10 | **1.** आकाशवाणी, दूरदर्शनवर पर्यावरणीय माहिती किंवा खाजगी वाहिन्यांमध्ये, सोशल मीडियावर जसे: यु ट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर इत्यादीवर पर्यावरण माहिती/ लेख/ भाषण/ चित्रफित/ व्हिडिओ/ पर्यावरणीय म्हणी /पर्यावरणीय अभंग अपलोड करणे.<br>**2.** पर्यावरण परिषदा/ कार्यशाळा/ रिफ्रेशर / ओरिएंटेशन /शॉर्ट टर्म कोर्समध्ये साधन व्यक्ती म्हणून पर्यावरणासंदर्भात मार्गदर्शन करणे.<br>**3.** महाविद्यालयात दर्शनीय ठिकाणी वृक्ष कुंडी ठेवली असल्यास. | ➢ आकाशवाणी, दूरदर्शन व इलेक्ट्रॉनिक मीडियावर माहिती दिलेली असावी.<br>➢ सोशल मीडियावर पर्यावरणीय माहिती (अपलोड केल्याची लिंक जोडावी.)<br>➢ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी पर्यावरणाशी निगडित ऑनलाईन/ ऑफलाइन मार्गदर्शन केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.<br>➢ महाविद्यालयात दर्शनी ठिकाणी किमान वीस कुंडी ठेवलेले असाव्यात. कमाल गुण एक.<br>➢ प्रत्येक कार्यास एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 11 | **अ)** महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावामध्ये वृक्ष लागवड कार्यक्रम राबविणे.<br><br>**ब)**पर्यावरणावर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस, मासिकास, नियतकालिकास किमान 5000 रुपये डोनेशन दिल्या संदर्भात पुरावे जोडणे.<br>**क)**पर्यावरणासंदर्भात शासकीय कार्यालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाकरिता तज्ञ व्यक्ती/ सदस्य म्हणून नियुक्ती किंवा कार्य केले आहे का? | दत्तक घेतलेल्या गावांमध्ये किमान 50 वृक्ष लागवड केल्याचे ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>स्वयंसेवी संस्थेस अथवा इतर पर्यावरणावर काम करणाऱ्या मासिक, नियतकालिकास, आर्थिक मदत दिल्याचे पुरावे सादर करणे.<br>➢ दत्तक घेतलेल्या गावांमध्ये वृक्ष लागवडी संदर्भात जिओ टॅग केलेले फोटो जोडावे.कमाल गुण दोन.<br>➢ डोनेशन दिलेली पावती जोडणे अनिवार्य.कमाल एक गुण.<br>➢ पर्यावरणासंदर्भात शासकीय समितीवर नेमणुकीस कमाल गुण एक.<br>➢ **अ, ब, क साठी कमाल गुण चार.** | 04 |
| 12 | 1.जल पुनर्भरण कार्यक्रम जसे बोरवेल, विहीर, शेततळ्याच्या माध्यमातून जल साठवणूक आणि पुनर्भरण करण्यासंदर्भात महाविद्यालयाने राबविलेले कार्यक्रम.<br>2. महाविद्यालय परिसरातील इमारतीच्या | ➢ प्रत्येक कार्याचा पुरावा जोडावा.<br>➢ प्रत्येक कार्यास किमान एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| | छतावरील पाण्याचे जमिनीत पुनर्भरण करणे.<br>3.जल, जमीन, जंगल, परिसंस्था आणि जैवविविधतेच्या संवर्धनासंदर्भात महाविद्यालयाने केलेली कामे. | | |
| 13 | 1.लायन्स क्लब, पाणी फाउंडेशन, नाम फाउंडेशन, वसुंधरा फाउंडेशन, ऋत फाउंडेशन, रिलायन्स फाउंडेशन, वृक्षमित्र फाउंडेशन, परमविश्व फाउंडेशन, निसर्गाची शाळा, वन विभाग महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन व इतर स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने शहरांमध्ये/ गाव शिवारात वृक्ष लागवड करणे किंवा पर्यावरणाशी निगडित काम करणे.<br>2. वन महोत्सव कार्यक्रम, पर्यावरण महोत्सव कार्यक्रम, वसुंधरा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करणे.<br>3. तालुका, जिल्हा विधी समिती/ वकील संघ यांच्या समन्वयाने पर्यावरणासंबंधी राबविण्यात आलेले कार्यक्रम. | ➢ प्रति कार्यासाठी 0.5 मार्क.<br>➢ प्रस्तुत कार्य महाविद्यालय आणि स्वयंसेवी संस्था किंवा प्रशासनाच्या समन्वयाने झालेले असावे.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 14 | 1.जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, तहसील कार्यालय परिसर, पंचायत समिती कार्यालय परिसर, पोलीस स्टेशन परिसर, शासकीय वसतिगृह परिसर, महावितरण कार्यालय परिसर, शासकीय विश्रामगृहे परिसर, बस स्थानक परिसर, रेल्वे स्थानके परिसर, दवाखाना परिसर, पोस्ट ऑफिस परिसर, धार्मिक स्थळे परिसर, समाज कल्याण कार्यालय परिसर, न्यायपालिका परिसर, नगरपरिषद कार्यालय परिसर, सामाजिक वनीकरण कार्यालय परिसर, ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात,कृषी, भूमी अभिलेख परिसर ,जिल्हा परिषद कार्यालयाच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड करणे व इतर शासकीय कार्यालयाच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड केली असल्यास.<br>2.रस्त्याच्या कडेला वृक्ष लागवड केली आहे का?. | ➢ प्रत्येक कार्याचा पुरावा जोडावा.<br>➢ प्रत्येक कार्यास किमान एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 15 | महाविद्यालयाने विविध विभागामार्फत पर्यावरण संदर्भातील घेतलेले कार्यक्रम जसे: भितीपत्रके, पर्यावरण संबंधित पॉम्प्लेटचे शहरात- ग्रामीण भागात वाटप, पर्यावरणीय संवर्धन संदर्भात मॉडेल तयार करणे, पर्यावरण अभ्यास मंडळ तयार करून कार्यक्रम घेणे. | ➢ प्रत्येक कार्याचा पुरावा जोडावा.<br>➢ प्रत्येक कार्यास किमान एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 16 | 1. महाविद्यालयाने पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या प्राध्यापकास, कर्मचाऱ्यास, | ➢ कमाल गुण चार. | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यास पर्यावरण पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे का? | | |
| 17 | 1.स्थानिक पातळी ते राष्ट्रीय पातळीवर नदी, ओढा, तळे, सरोवराची स्वच्छता अभियान कार्यक्रम.<br>2.भूमी प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण कमी करण्यासंदर्भात महाविद्यालयाने घेतलेला सहभाग.<br>3. प्रदूषण नियंत्रणासाठी परिवहन विभाग, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ, राज्यस्तरीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यासोबत राबविलेले कार्यक्रम. | ➢ प्रत्येक कार्यास 0.5 गुण.<br>➢ कमाल गुण चार.<br>. | 04 |
| 18 | 1. महाविद्यालयाचा पाणी आडवा पाणी जिरवा कार्यक्रम, जलयुक्त शिवार अभियानात सहभाग.<br>2.जैविक शेतीचे महत्व पटवून देण्यासंदर्भातील कार्यक्रम.<br>3. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी, कर्मचाऱ्यांनी जैविक शेती प्लॉट तयार केला आहे का?<br>4. बांबू शेती/ कृषी वनीकरण (Agroforestry (or agro-sylviculture) आर्थिक विकास आणि पर्यावरण संवर्धन संदर्भात राबविलेले कार्यक्रम. | ➢ प्रत्येक कार्यक्रमास एक गुण.<br>➢ जैविक शेती प्लॉटचा पुरावा जोडणे. व्हिडिओची लिंक असेल तर अपलोड करावी किंवा फोटोचा पुरावा जोडावा.<br>➢ बांबू शेती/ कृषी वनीकरण संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केल्या संदर्भात पुरावा जोडणे. प्रति कार्यक्रमास एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 19 | 1.ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य. अंगणवाडी सेविका, महिला बचत गट, राजकीय कार्यकर्ते, शेतकरी यांच्यासाठी पर्यावरण परिषदेचे/ कार्यशाळेचे आयोजन करणे.<br>2. महाविद्यालयात निर्माण केलेल्या पर्यावरणीय साधनसंपत्तीच्याद्वारे विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य करण्यासंदर्भातील कार्य. | ➢ महाविद्यालयाने घेतलेल्या परिषदा/ कार्यशाळा प्रत्येक परिषदेस/ कार्यशाळेस एक गुण.<br>➢ महाविद्यालयातील पर्यावरणीय साधनसंपत्तीच्याद्वारे विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्यास सर्व विद्यार्थ्यांसाठी एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 20 | 1.शैक्षणिक सहलीचे आयोजन करून विद्यार्थ्याकडून पर्यावरण संवर्धन, प्रचार आणि प्रसारासंबंधी प्रकल्प तयार करून घेणे व प्रकल्प प्रशासनास सादर करणे.<br>2. दुष्काळ निवारण करण्यासंदर्भात केलेली कामे.(Field work out of campus)<br>3. नैसर्गिक आपत्ती संदर्भात महाविद्यालयाने केलेले कामे.<br>(आपत्तीपूर्व कार्य, आपत्तीच्या वेळी केलेले कार्य, आपत्ती झाल्यानंतर केलेले कार्य) | महाविद्यालयाने शैक्षणिक सहलीचे आयोजन केलेले असावे. सहली दरम्यानच्या पर्यावरणाच्या वेगवेगळ्या मुद्द्यावर महाविद्यालयात, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यापैकी किमान एका ठिकाणी अहवाल पाठविल्याचा पुरावा सादर करणे.<br>➢ प्रत्येक वर्षीच्या सहलीस(अहवाला सहीत) एक गुण.<br>➢ दुष्काळ निवारणासंदर्भात केलेले कार्य, प्रति कार्यास एक गुण.<br>➢ नैसर्गिक आपत्ती संदर्भाच्या जागरूकतेच्या संदर्भात घेतलेले कार्यक्रम. प्रत्येक कार्यक्रमास एक | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गुण.<br>➢ कमाल गुण चार. | |
| 21 | **अ)**प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पर्यावरणासंदर्भात केलेले संशोधन, पेपर वाचन, पर्यावरण संबंधीचा मायनर रिसर्च प्रोजेक्ट, मेजर रिसर्च प्रोजेक्ट, विद्यापीठ स्तरीय रिसर्च प्रोजेक्ट इत्यादी.<br>**ब)** महाविद्यालय स्तरावर पर्यावरण अध्यासन केंद्राची निर्मिती केली आहे का?<br>**क)**विद्यापीठ स्तरीय पर्यावरण अध्यासन केंद्राच्या संदर्भात केलेला MoU किंवा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भू-संकुला सोबत केलेला पर्यावरणी करार. | ➢ प्रत्येक संशोधनास एक गुण.<br>➢ पर्यावरण अध्यासन केंद्रास एक गुण.<br>➢ पर्यावरण अध्यासन केंद्रास केलेल्या करारास (MoU) एक गुण.<br>➢ अ, ब, साठी प्रत्येकी कमाल दोन. गुण आणि 'क' साठी एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 22 | 1. शहरात- ग्रामीण भागात पर्यावरण जागृती संदर्भात रॅलीचे आयोजन करणे. जसे जागतिक तापमान वाढ, हवामान बदल, पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड, जल, जमीन, जंगल संवर्धन, नदी संवर्धन, परिसंस्था संवर्धन, परिसर स्वच्छता, परिसंस्था संवर्धन इत्यादी कार्यक्रम.<br>2. पर्यावरण जागृती संदर्भात दिनविशेष साजरे करणे जसे- पर्यावरण दिन, भूगोल दिन, जागतिक लोकसंख्या दिन, मृदा दिन (Soil Day), जैवविविधता दिन, वसुंधरा दिन, ओझोन दिन, वन दिन, जागतिक वन्यजीव दिन, अक्षय ऊर्जा दिन, जागतिक चिमणी दिन, जागतिक महासागर दिन, जलदिन, हवामान दिन, जागतिक ऊर्जा दिन, अक्षय ऊर्जा दिन, जागतिक वृक्ष दिन, जागतिक पर्यटन दिन, जागतिक मधमाशी दिन व इतर पर्यावरण संवर्धनासंदर्भातील दिनविशेष साजरे करणे. | ➢ प्रत्येक पर्यावरणीय रॅलीस एक गुण.<br>➢ प्रत्येक दिनविशेष कार्यक्रमास एक गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| 23 | 1.बीज संकलन बँक, सीडबॉल, रोपवाटिका केंद्र महाविद्यालयात सुरू असल्यास.<br>2.महाविद्यालयातील कचरा जाळून नष्ट करण्यास प्रतिबंध केला असल्यास.<br>3. महाविद्यालयात कचराकुंडीचा (डस्टबिन) वापर केला असल्यास. | ➢ बीज संकलन बँक, सीडबॉल, रोपवाटिका केंद्र महाविद्यालयात सुरू असल्यास प्रत्येक कार्यास एक गुण.<br>➢ महाविद्यालय परिसरात कचरा जाळण्यासाठी प्रतिबंध केल्यास एक गुण.<br>➢ महाविद्यालयात किमान दहा डस्टबिन(कचराकुंडी) असावेत.<br>➢ डस्टबिन(कचराकुंडी) पर्यावरण पूरक असाव्यात. कमाल गुण एक<br>➢ कमाल गुण चार. | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 24 | 1. ऊर्जा बचतीसाठी महाविद्यालयात केलेल्या उपाययोजना.<br>2.महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचाऱ्यांना सायकलचा वापर.<br>3. महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक वाहनांचा वापर.<br>4. महाविद्यालयाने प्रदूषणमुक्त इलेक्ट्रिक बस खरेदी करून त्याचा वापर केला असल्यास. | महाविद्यालयात प्रस्तुत कार्यासाठी केलेल्या कार्याचे पुरावे सादर करणे.<br>➢ ऊर्जा बचती संदर्भात केलेल्या योजनेसाठी(जसे की, कमी वॅटचे बल्ब व फॅनचा वापर करणे, महत्त्वाच्या ठिकाणी सूचना फलक) ऊर्जा बचती संदर्भात केलेले कार्यक्रम - प्रत्येक ॲक्टिव्हिटीज साठी 0.10 गुण .<br>➢ सायकलचा आणि सार्वजनिक वाहनाचा वापर करत असल्याचा पुरावा जोडणे आवश्यक, प्रस्तुत कार्यासाठी प्रतिकार्य 0.5 गुण.<br>➢ प्रदूषण फ्री इलेक्ट्रिक बससाठी दोन गुण.<br>➢ कमाल चार. गुण | 04 |
| 25 | 1.महाविद्यालयाच्या प्रांगणात वनस्पतीसाठी, उद्यानासाठी, वृक्षासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन प्रणाली कार्यान्वित असल्यास.<br>2. महाविद्यालयास शासनाचा, विद्यापीठाचा पर्यावरणीय पुरस्कार मिळाला असल्यास.<br>3. मृदा परीक्षण, जल परीक्षण प्रयोगशाळा महाविद्यालयात उपलब्ध आहे का? | ➢ तुषार सिंचन, ठिबक सिंचन महाविद्यालयात कार्यान्वित असल्यास चार गुण.<br>➢ महाविद्यालयास विद्यापीठाचा, शासनाचा पर्यावरण पुरस्कार मिळाल्यास चार गुण.<br>➢ कमाल गुण चार. | 04 |
| **एकूण गुण** | | | **100** |

प्राचार्याचे नाव, सही व शिक्का.